**मा. दिवाणी न्यायालय क. स्तर गेवराई यांचे न्यायालयात**
**नियमीत दिवाणी दावा क्र. २९ /२०२३**
**सारीका वि. प्रकाश व इतर**
**निशाणी क्र. ५ आणि १९ वरती संयुक्तीक आदेश पारीत**

**०१.** सदरचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी जमिनीचे कुठलेही हस्तांतरण करु नये अशा मागणीचा अर्ज केलेला आहे. प्रतिवादी क्र. ५ यांनी न्यायालयात हजर होऊन ते वादग्रस्त मिळकतीचे हस्तांतरण करणार नाहीत याबाबत हमीपत्र दिलेले आहे.

०२. वादीतर्फे निशाणी क्र. १९ वरती अर्ज देऊन त्यामध्ये नमुद केले की, प्रतिवादी क्र. ४ हा दावा मिळकतीमध्ये आला व त्याने दावा जमिनीवर बांधकाम करण्याच्या यंत्राव्दारे दावा जमिनीवर खड्डे तयार केले. त्यावेळी प्रतिवादी क्र. ४ याने दावा मिळकतीवर जेसीबी यंत्राव्दारे खड्डे खांदल्याचे दिसुन आले. वादीच्या वतीने सदर प्रतिवादीस खड्डे खोदु नको अशी विनंती करण्यात आली परंतु त्याने ऐकले नाही. त्यावेळी प्रतिवादी क्र. ५ याने वादीच्या पतीस धमक्या देऊन शिवीगाळ केली. वादीने सदर अर्जासोबत शपथपत्र देऊन दि. १५.०२.२०२३ रोजी दुपारी १.३६ वाजता आणि १.४१ मिनीटाचे दोन फोटो अभिलेखावर वादग्रस्त मिळकतीच्या लोकेशनसहीत दाखल केलेले आहे.

०३. प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादीविरुध्द सरसनिरसमानाने वाटपपत्र होऊन नोंदणीकृत इसारपावती दस्त क्र. २९२५/२०२० बंधनकारक नाही असे घोषीत करुन मिळणेबाबत दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ५ हे हजर झालेले आहेत परंतु त्यांनी त्यांची लेखी कैफियत दिलेली नाही. त्याचवेळी प्रतिवादी क्र. ४ हे दाव्यात अद्यापपर्यंत हजर झालेले नाहीत.

०४. अशा परिस्थितीत जर वादग्रस्त मिळकत आहे त्या स्थितीत कायम ठेवणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होणार आहे. अभिलेखावर असलेल्या दस्तातुन असे दिसुन येते की, वादी ही प्रतिवादी क्र. १ यांची मुलगी आहे. अभिलेखावर असणारे वादातीत कब्जे इसारपावतीमध्ये वादी ही पक्षकार नाही तसेच अभिलेखावर दाखल असणाऱ्या कब्जे इसारपावतीच्या सत्य प्रतीवरुन त्या त्यामध्ये पक्षकार असल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे तुर्तास प्राथमिक स्वरुपात आहे त्या वादग्रस्त मिळकतीची स्थिती कायम ठेवणे हे

उभयपक्षकारांच्या हिताच्या आहे. अभिलेखावर दाखल केलेल्या फोटोमधुन असे दिसुन येते की, वादग्रस्त मिळकतीमध्ये खोदकाम केल्याचे दिसुन येते.

०५. अभिलेखावर सदरची बाब वादीने शपथपत्राच्या माध्यमातुन दाखल केलेली आहे त्यामुळे तुर्तास त्यावरती शंका उपस्थित करता येणार नाही. वादीचा प्रतिवादी क्र. ४ व ५ यांच्याविरुध्द तात्पुरता मनाई हुकुमाचा अर्ज प्रलंबित आहे. अशा स्थितीत प्रतिवादी क्र. ४ व ५ यांना वादग्रस्त मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचे हस्तांतरण, कर्जबोजा व अडथळा निर्माण करण्यापासुन रोखने अत्यंत गरजेचे आहे. सदरचा दावा हा अत्यंत प्राथमिक स्वरुपात असल्यामुळे वादग्रस्त मिळकतीवरीला ताबा हा उभयपक्षकारांच्या कथन, प्रतिकथन व युक्तीवादानंतर ठरवण्यास मदत होईल व ठरवीता येईल. त्यामुळे सदरची वादग्रस्त मिळकत ही दाव्यात प्रतिवादी क्र. ४ व ५ यांचे म्हणणे सुध्दा विचारात घेणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे वादग्रस्त मिळकत आहे त्या स्थितीत कायम ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे वरील सर्व बाबींचा विचार करता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| ०१. | प्रतिवादी क्र. ४ व ५ यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी पुढील तारखेपर्यंत वादग्रस्त मिळकतीची स्थिती आहे ती कायम ठेवण्यात यावी त्यामध्ये कोणताही प्रकारचा बदल, खोदकाम, बांधकाम करु नये तसेच वादग्रस्त मिळकतीचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण किंवा बोजा निर्माण करु नये, छेडछाड अथवा नष्ट करु नये अशा स्वरुपाचा तात्पुरता तुर्तातुर्त मनाई हुकुम **केवळ** पुढील तारखेपर्यंत देण्यात येतो. |
| ०२. | वादीने प्रतिवादी क्र. ४ यांना पुढील तारखेपर्यंत दाव्याची व निशाणी क्र. ५ च्या बाबतीतील नोटीस न चुकता तामीली करावी जेणेकरुन सदरचा निशाणी क्र. ५ गुणवत्तेवर निकाली काढता येईल. वादींनी मागणी केल्यास त्यांना विशेष बेलीफ योग्य तो न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर देण्यात यावा. |
| ०३. | सदरच्या आदेशाचे पालन काटेकोरपणे वादी व प्रतिवादी यांनी करावे. |

SANJAY MOTIRAM GHUGE Date: 2023.02.17 17:52:56 +0530

दि. १६.०२.२०२३

(एस. एम. घुगे)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Order.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 16/02/2023 |
| Transcribed on | : | 16/02/2023 |
| Checked & signed on | : | 16/02/2023 |

sd./-
(V. V. Mandve )
Stenographer Grade-3, Georai.